AICTE
F/c

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे / संकेतस्थळ

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/संस्था-पत्र/२०२२-२३/२७६
दिनांक : ०३/११ / २०२२

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या मुदतवाढी बाबत....**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२२-२३/२०७ दि.०५/०८/२०२२
२. या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२२-२३/२११ दि.१२/०८/२०२२
३. या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/स्वनाथ-शिष्य/विकाप/२०२२-२३/२४८ दि.३०/०९/२०२२
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. D-१२०११/०३/२०२२-DBT दि.३१/१०/२०२२

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील ( NSP Portal संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती** योजनांची माहिती तसेच केंद्र शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या खालील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र.१ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आलेले आहे.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे पूर्वीचे वेळापत्रक :: **शै.वर्ष २०२२-२३** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम मुदत** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर,२०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करणे. | १५ नोव्हेंबर,२०२२ |

तरी आता,केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये व सोबत जोडलेल्या एनएसपी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या **प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती** योजनांच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

| विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे **सुधारित वेळापत्रक** :: शै.वर्ष २०२२-२३ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम मुदत** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३० नोव्हेंबर,२०२२ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करणे. | १५ डिसेंबर,२०२२ |

तरी सर्व संस्थांनी, सदर योजनेसाठी देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबतचे सुधारित वेळापत्रक संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावे व त्यांच्या संस्थेत शिकत असलेल्या सदर योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठीच्या वाढीव मुदतीबाबत निदर्शनास आणून द्यावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्ज करता येईल.

तसेच, सर्व संस्थांनी, उपरोक्त योजनेचे त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज, प्रलंबित न ठेवता सुधारित वेळापत्रकानुसार अंतिम मुदतीपूर्वी तपासणी करुन ( मंजूर / नामंजूर ) निकाली काढावेत.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

**प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई. (Email Id:- psec.higheredu@maharashtra.gov.in )
२. मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई. (Email Id:- acs.mdd@maharashtra.gov.in ; desk६.mdd-mh@mah.gov.in )
३. मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग आयुक्तालय, ३ चर्च पथ, पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, आगरकर नगर, पुणे -४११ ००१. (Email Id — comm.socwelfare@maharashtra.gov.in )
४. मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन, १ ला मजला, जुना आग्रा रोड, गडकरी चौक, नाशिक- ४२२ ००२. (Email Id :- ctd.nsk-mh@gov.in)
५. मा. संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग संचालनालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, ३ बी.जे. मेडिकल रोड, पुणे — ४११ ००१ (Email Id — dvjntobcsbcwpune@gmail.com)
६. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१. (Email Id :- schol.dhepune@gov.in )
७. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर ( Email Id :- rooffice@dtemaharashtra.gov.in ) यांना माहितीसाठी व सदर योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करुन जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार कार्यवाही पूर्ण करुन घेण्यासाठी.

-----------

Inbox (6,544) - desk18@dtemaharas × Home - National Scholarship Portal × +

scholarships.gov.in

## Notice Board - For Students

All grievances related to delay in Application Verification, Scheme Selection / Eligibility, extension of verification dates, delay in Scholarship Payment should be addressed to the grievance redressal / Nodal officer of the concerned scheme owner ministry / Department. The details of

## Notice Board - For Institutes

Option to apply for Institute KYC Registration is available under "Institute Corner" section on the portal.

The detailed operational steps involved in filling the Institute KYC Registration Form is available under the option "Institute Information" at "Institute Corner"section on the portal.

All Institutes are advised to refer "Frequently Asked Questions (FAQs)" and "Institute Operational Manual"

## Notice Board - For Nodal Officers

The National Scholarships Portal has been launched for AY 2022-23. Students can apply for Scholarships(Fresh &

Central Schemes | UGC / AICTE Schemes | State Schemes

University Grants Commission - MHRD +

All India Council For Technical Education-AICTE -

| Scheme Name | Scheme Closing Date | Defective Application Verification Date | Institute Verification | DNO/SNO/MNO Verification | Guidelines/FAQ |
|---|---|---|---|---|---|
| PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DEGREE) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |
| PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS ( TECHNICAL DIPLOMA) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |
| SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT ( TECHNICAL DEGREE) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |
| SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT ( TECHNICAL DIPLOMA) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |
| AICTE - SWANATH SCHOLARSHIP SCHEME (TECHNICAL DIPLOMA) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |
| AICTE - SWANATH SCHOLARSHIP SCHEME ( TECHNICAL DEGREE) | Open till 30-11-2022 | Open till 15-12-2022 | Open till 15-12-2022 | Open till 31-12-2022 | Guidelines FAQ |

30°C Smoke    Search    ENG IN    6:21 01-11-2022